एस. सी. आर. ४६६

(इंग्रजी न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर )

माहेश्वरी वरिष्ठ उच्च माध्यमिक विद्यालय व इतर

वि.

भिखम राम शर्मा आणि इतर .

फेब्रुवारी १२, १९९६

[के. रामास्वामी आणि जी. बी. पटनायक, न्या. न्या.)

सेवा कायदा :

तदर्थ तत्त्वावर नियुक्ती- पद रद्द करणे- त्यानंतर सेवा समाप्ती - न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालयाने असे मत मांडले कि सेवा समाप्ती हि नियम बाह्य आहे. - असा निर्णय दिला कि पद संपुष्टात आल्याच्या तारखेपासून पदधारक हा संपुष्टात आल्याच्या तारखेपासून, त्याची सेवा रद्द केली जाते- म्हणून सेवा समाप्ती करणे योग्यच आहे. - नियमांतर्गत चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र

## दिवाणी अपील क्रमांक ३६४५ / १९९६

राजस्थान उच्च न्यायाल डी.बी.सी.एस.ए.(रिट) क्रमांक ४८२ / १९९५ मधील दिनांक २९.८.९५ मधील निकालावरून आणि आदेशावरून.

याचिकाकर्त्यांसाठी एम. सी. भंडारे, विपिन गोगिया, सुशील के. जैन आणि ए. पी. दामीजा.

राजेश श्रीवास्तव, उज्ज्वल बॅनर्जी, एच.के.पुरी आणि एस.पी. लेनका. , उत्तरवादीसाठी

न्यायालयाने खालील आदेश देण्यात दिला :

अनुमती दिली

राजस्थान उच्च न्यायालयाच्या डी. बी. विशेष अपील (रिट) क्रमांक ४९२/९५ यामधील आदेशामुळे विशेष अनुमतीद्वारे हे अपील उध्दभवले आहे. थोडक्यात प्रश्न असा आहे की, उत्तरवादी याना रद्द करण्यात आलेल्या पदावर कायम कार्यरत राहण्याची परवानगी देता येईल का? उत्तरवादीची यांची लगुलेखक -टंकलेखक म्हणून तदर्थ तत्वावर दिनांक १५ जुलै १९९२ पासून नेमणूक करण्यात आली होती यात अजिबात वाद नाही. नोकरी चालू असताना लघुलेखक टंकलेखक हे तदर्थ पद कायम ठेवण्याची गरज नाही, असा ठराव २१ मे १९९४ रोजी व्यवस्थापनाने पारित केला होता. परिणामी हे पद रद्द करण्यात आले व त्यानंतर ३१ मे १९९४

रोजी ही सेवा संपुष्टात आणण्याचा वादग्रस्त आदेश देण्यात आला. जेव्हा अपीलकर्ते न्यायाधिकरणाकडे आणि नंतर उच्च न्यायालयात गेले होते, तेव्हा उच्च न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की टर्मिनेशन (सेवा समाप्ती ) हि  नियमानुसार नाही आणि नियमानुसार चौकशी करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. उच्च न्यायालयाने अवलंबलेला दृष्टिकोन पूर्णपणे चुकीचा आहे. पद रद्द केल्यावर पद संपुष्टात आल्याच्या तारखेपासून पदावरील विद्यमान धारक पदावर कायम राहणार नाही, असा कायदा आहे. प्रतिवादीची सेवा समाप्ती केवळ पद रद्द केल्यामुळे होत असल्याने नियमांतर्गत चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

त्यानुसार अपील मंजूर केले आहे . खर्च नाही.

अपील मंजूर

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x